ऐक्य
९२ वर्षांची वाचनीय परंपरा
: www.dainikaikya.com सातारा बुधवार दि. ४/१/२०१७ email : news@dainikaiky

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव


डी. पी. भोसले कॉलेजच्या मैदानावर प्रात्यक्षिक दाखवताना सातारा पोलिसांचे बाँब शोधक पथक.

# नागरिकांनी पुढाकार घेतल्यास दहशतवाद आणि नक्षलवाद चळवळ उद्‌ध्वस्त होईल : यादव

▲ **कोरेगाव,** दि. ३ : देशातील नागरिक हे पोलीस दलाचे डोळे आहेत. या नागरिकांसमोर अनेकविध घडामोडी घडत असतात, नागरिकांनी सावध होत, जरासा पुढाकार घेऊन, त्याची माहिती पोलीस दलाला दिली तर दहशतवादी आणि नक्षलवादी चळवळ उद्‌ध्वस्त होण्यास वेळ लागणार नाही, असा विश्‍वास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र यादव यांनी व्यक्त केला. रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. कॉलेजमध्ये पोलीस उन्नत दिनाचे औचित्य साधून बाँब शोधक व नाशकाची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. त्यावेळी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर उपनिरीक्षक अमिन मुलाणी, बळीराम सांगळे, चंद्रशेखर पिल्ले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यादव म्हणाले, पोलीस हा गणवेषातील नागरिक तर नागरिक हा साध्या वेषातील पोलीस आहे. देशांतर्गत सुरक्षा राखण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सदैव सहकार्य केले पाहिजे. नागरिक सजग झाल्यास नक्षलवाद आणि दहशतवाद उखडून टाकण्यास वेळ लागणार नाही. दहशतवादी व नक्षलवादी हे समाजाची आर्थिक व जीवित हानी करून दहशत निर्माण करून स्वत:चा स्वार्थ साधण्याचा प्रयत्नात आहेत. सर्वसामान्य नागरिकांचा गाफीलपणा हा दहशतवादी आणि नक्षलवादी कृत्यांना खतपाणी घालणारा ठरतो. सर्वसामान्यांनी वेळीच दक्षता घेतल्यास दहशतवादी आणि नक्षलवादी कृत्यापासून होणारी देशाची हानी आपण टाळू शकतो.

यावेळी विद्यार्थ्यांना विविध प्रकारची प्रात्यक्षिके दाखवून त्यांचे प्रबोधन करण्यात आले. प्रा. संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. बाळासाहेब भोसले यांनी आभार मानले.